॥ भातुकलीच्या खेळामधलीं राजा आणिक राणी ॥

गायकः अरुण दाते
गीतः मंगेश पाडगांवकर
संगीतः यशवंत देव

भातुकलीच्या खेळामधलीं राजा आणिक राणी,
अर्ध्यावरती डाव मोडला अधुरी एक कहाणी ॥ धृ. ॥

राजा वदला, " मला समजली शब्दावाचुन भाषा,
माझा नशिबासवें बोलती तुझ्या हातच्या रेषा"
कां राणीच्या डोळां तेव्हां दाटुनि आलें पाणी? ॥ १ ॥

राणी वदली बघत एकटक दूरदूरचा तारा
"उद्यां पहाटे दुसऱ्या वाटा, दुज्या गांवचा वारा"
पण राजाला उशिरां कळली गूढ अटळ ही वाणी ॥ २ ॥

तिला विचारी राजा, "कां हे जीव असे जोडावे?
कां दैवानें फुलण्याआधीं फूल असें तोडावें?"
या प्रश्णाला उत्तर नव्हतें, राणी केविलवाणी ॥ ३ ॥

कां राणीनें मिटले डोळे दूर दूर जातांना,
कां राजाचा श्वास कोंडला गीत तिचें गातांना
वाऱ्यावरती विरून गेली एक उदास विराणी ॥ ४ ॥